**फौजदारी जामीन अर्ज क्र. ५०/२०२६**
**काशीनाथ एकनाथ वाघ + ४**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
(CNR NO. MHBU20-000111-2026)

## नि.क्र. १ खाली आदेश
## (पारीत दिनांक १२ मार्च २०२६)

०१] अर्जदार क्र. १ ते ५ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८२ अन्वये अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी व आरोपी हे एकाच गावचे रहिवासी असुन वेगवेगळ्या समाजाचे आहेत. ग्राम चिखला काकड येथे अंगणवाडी शाळे समोर अज्ञात ईसमाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा अनाधिकृतपणे पुतळा बसवीला व पुतळ्याचे ठिकाणी बांधकामाचे कारणावरुन दिनांक २०.०२.२०२५ रोजी गावातील महीला व संजीवनी काशीनाथ वाघ यांचे मध्ये वाद झाला. त्या कारणा वरुन दिनांक २१.०२.२०२६ रोजी रात्री ०२.३० वाजेच्या सुमारास आरोपी क्र. १) विठठल काशीनाथ वाघ, २) विकास काशीनाथ वाघ, ३) गजानन गोवींद घोडके, ४) योगेश भागवत शेळके, ५) सचिन श्रीकृष्ण ठाकरे, ६) वैभव गजानन शिनगारे, ७) कैलास सुखादेव मानवतकर, ८) गणेश दतात्रय मानवतकर, ९) सुरज सोपान टेकाळे, १०) प्रभु बाबुराव मिसाळ, ११) विष्णु बाबुराव मिसाळ, १२) काशीनाथ एकनाथ वाघ, १३) सतीष एकनाथ बुरकुल व त्यांचे सोबत ईतर २० ते २५ अनोळखी आरोपी हे गैरकायद्याची मंडळी जमवुन दंगा करुन फिर्यादीचा चुलत भाऊ सरपंच गणेश भास्कर काकड याचे घरा जवळ आले. आरोपींनी शिवीगाळ करुन त्यांचे घराचे दरवाज्यावर काठी आणि दगड मारुन दरवाजा तोडला व त्यांचे घरात अनधीकृत प्रवेश केला. फिर्यादीची वहीनी पुष्पलता गणेश काकड हिचा वाईट उद्देशान हात धरुन तिचे

अंगाला स्पर्श करुन तीचा विनयभंग केला. आरोपींनी सरपंच गणेश भास्कर काकड यास काठीने व हाताचापटांनी मारहान करुन शिवीगाळ केली व जिवाने मारण्याच्या धमक्या दिल्या. आरोपींनी त्यांचे घरातील सामानाची तोडफोड करुन नुकसान केले. फिर्यादी हा सोडवायला गेला असता, त्याला सुध्दा आरोपीतांनी लोटपाट करुन शिवीगाळ केली. आरोपींनी दंगा करत गावात ग्रामपंचायत जवळील मोटार सायकलची तोडफोड करुन नुकसान केले. आरोपींनी विष्णु देवीदास नागरे यांचे घराचे दरवाज्यावर व खिडक्यांवर दगड काठ्या मारुन काचा फोडले व त्याचे नुकसान केले. आरोपींनी गल्लीत जोरजाराने धिंगाना घालुन शिवीगाळ केली व धमक्या दिल्या. अशा आशयाची फिर्याद पोलीस ठाणे, बिबी येथे दाखल करण्यात आली.

**०३]** अर्जदारांच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. एम. देशमुख यांनी युक्तिवाद केला की, घटना ही दिनांक २१.०२.२०२६ रोजी घडली असून फिर्याद ४ दिवस उशिरा दिनांक २५.०२.२०२६ रोजी विचारपूर्वक दाखल करण्यात आली आहे. संजिवनी वाघ हिने दिनांक २१.०२.२०२६ रोजी फिर्यादीचा भाऊ व इतरांविरूद्ध अगोदर फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीला प्रतिशह देण्यासाठी जाणीवपूर्वक ही खोटी फिर्याद दाखल करण्यात आली. घटनेच्या दिवशी चिखला काकड येथे ५०० पोलिसांचे पाचारण करण्यात आले होते. त्यामुळे फिर्यादीत नमूद घटना घडणे अशक्य आहे. तशी घटना घडली असती तर फिर्याद त्वरीत किंवा १ दिवस उशिरा दाखल करण्यात आली असती. अर्जदारांविरूद्ध नमूद असलेल्या गुन्ह्यात ७ वर्षांपर्यंतची शिक्षा आहे. या प्रकरणातील महत्त्वपूर्ण तपास संपलेला आहे. आरोपी/अर्जदारांना या खोट्या गुन्ह्यात गोवलेले आहे. अर्जदारांची कोणतही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहेत. अर्जदारांना जामीन मिळाल्यास ते जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहेत. म्हणून अर्जदारांना जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

**०४]** याउलट, विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. यु. एस. आपटे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, दोन समाजात या घटनेमुळे जातीय तेढ निर्माण झालेले आहे. आरोपींनी दखलपात्र गुन्हा घडवून आणलेला आहे. अर्जदारांनी केलेला गुन्हा हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून या प्रकरणाचा तपास प्रगतीपथावर आहे. आरोपी/अर्जदारांना जामिन दिल्यास ते तपासात सहकार्य करणार नाहीत. उलट अर्जदार साक्षीदारांवर दबाव आणून त्यांना फितूर करु शकतात. तसेच अर्जदार अशाच प्रकारच्या गुन्ह्याची पुनरावृत्ती करु शकतात. म्हणून अर्जदारांचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

**०५]** दोन्ही पक्षाच्या युक्तीवादाचे अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, घटना ही दिनांक २१.०२.२०२६ रोजी घडली असून फिर्याद चार दिवस उशिरा दिनांक २५.०२.२०२६ रोजी दाखल करण्यात आली आहे. फिर्यादीचा भाऊ हा सरपंच असून आरोपी संजिवनी ही राजकीय पक्षाची उपजिल्हा प्रमुख आहे. शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्याच्या कारणावरून दोन राजकीय पक्षात मतभेद आहेत. आरोपी संजिवनी वाघ हिने गावातील सरपंच व इतर यांच्याविरूद्ध अगोदर फिर्याद दिली आहे. त्यानंतर चार दिवसांनी ही फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही फिर्यादीनुसार दिनांक २१.०२.२०२६ रोजी चिखला काकड या गावात ठाणेदार, पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी हजर होते. त्यामुळे या सर्व बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

**०६]** याशिवाय अर्जदारांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदारांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण तपास संपलेला आहे. त्यामुळे अर्जदारांच्या न्यायीक कोठडीची आवश्यकता भासणार नाही. अर्जदार हे तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहेत.

तसेच अर्जदारांना जामीन मिळाल्यास ते जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहेत. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भीती व साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केले जाऊ शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थिती, गुन्ह्यास असलेली शिक्षेची तरतूद, अर्जदारांचे कृत्य व तपासाची स्थिती पाहता अर्जदारांचा अटकपूर्व जामीन अर्ज अटी व शर्तींनुसार मंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

**०१]** अटकपूर्व जामीन अर्ज क्र. ५०/२०२६ मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार **क्र. १) काशीनाथ एकनाथ वाघ, २) प्रभाकर उर्फ प्रभू बाबुराव मिसाळ, ३) विष्णू बाबुराव मिसाळ, ४) सतीश एकनाथ बुरकुल** आणि **५) कैलाश सुखदेव मानवतकर** यांना अटक होतेवेळेस पोलीस ठाणे, बिबी येथील अपराध क्र. ५२/२०२६, कलम ११८(१), ७४, ११५(२), १८९(२), १९१(२), १९१(३), ३३३, ३२४(४), ३५२, ३५१(२) सह कलम १९० भारतीय न्याय संहिता आणि कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम खालील गुन्ह्यात त्यांचे वैयक्तिक रू. ५०,०००/– **प्रत्येकाचे** बंधपत्र व सदर रकमेचे जामीनदार दिल्यानंतर अटकपूर्व जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदारांनी तपासात सहकार्य करावे आणि दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत दर मंगळवारी तपासी अंमलदारपुढे दुपारी ०२.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजर राहावे.

**०४]** अर्जदारांनी अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०५]** अर्जदारांनी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत मौजे चिखला काकड, ता. लोणार या गावात प्रवेश करू नये.

**०६]** अर्जदारांनी यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०७]** अर्जदारांनी वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.13 15:29:27 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरीक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – १२.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – १२.०३.२०२६